# नाशिकमध्ये आजपासून भारत-फ्रान्स युवा महोत्सव



*नाशिक ( म. टा. प्रतिनिधी ) :* भारत आणि फ्रान्समध्ये सांस्कृतिक बंध जोडण्यासाठी गेल्या बारा वर्षांपासून कार्य करणाऱ्या 'भारत-फ्रान्स सांस्कृतिक मंडळा'च्या तपोत्सवांतर्गत शनिवारपासून येथे भारत-फ्रान्स युवा महोत्सवाचा प्रारंभ होत आहे.

फ्रान्सच्या क्लेरमॉं फेरॉंद शहरातील निकोलस दलाईग्यु यांच्या सतारवादनाच्या मैफिलीने सुरू होणाऱ्या या महोत्सवात पुढील वर्षभर नाशिककरांना विविध कार्यक्रमांची मेजवानी मिळणार आहे.

फ्रान्समधील इस्वार, क्लेरमॉं-फेरॉं, मार्से, आक्स-आन-प्रोवान्स, ग्रेनोब्ल, रेनां आणि पॅरिस आदी शहरात नाशिकच्या शिवालय नृत्य कला मंदीरातील विद्यार्थिनींनी सादर केलेल्या भरतनाट्यम आणि लोकनृत्याने मे महिन्यात मंडळाच्या तपोत्सवाची सुरूवात झाली. आता नाशिकला होणार असलेल्या युवा महोत्सवास पॅरिसच्या मंडपम्, त्रिवेणी, इस्वारच्या असाली, मार्सेलच्या अरेबेस्कू-ए-मुद्राज् आणि अंजली, ग्रेनोब्लच्या मेसॉं-दे-कुलत्युर अशा संस्थांसोबतच फ्रेंच सरकारची सांस्कृतिक व शैक्षणिक कार्य करणारी संस्था 'अलियान्स-फ्रान्सेज', पॅरिसचे 'इंडिया हाऊस' व भारतीय दूतावास यांचे सहकार्य लाभणार असल्याची माहिती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. दीपक मगरे यांनी दिली.

या महोत्सवाचे उद्‌घाटन नाशिकच्या उपमहापौर शोभना आहेर यांच्या हस्ते आणि फ्रान्सस्थित अशोक पोलकम यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. परशुराम सायखेडकर नाट्यगृहात सायंकाळी साडेपाच वाजता होणाऱ्या या उद्‌घाटन सोहळ्यात निकोलस यांचे सतारवादन आणि नाशिकचे नितीन पवार यांचे तबला वादन होईल. विविध क्षेत्रांत आपल्या कार्याने ठसा उमटविणारे दहा फ्रेंच पाहुणेही यावेळी उपस्थित राहणार आहेत.

विख्यात भारतीय कलाकार अशोक पाठक, बलराम पाठक आणि नरेंद्र बटजू यांच्याकडून सतार वादनाचे प्रारंभिक धडे गिरवणारे निकोलस सध्या युरोपातील प्रसिद्ध संगीतज्ञ पॅट्रीक मुताल यांच्याकडे उच्च शिक्षण घेत आहेत. म्युझिकॉलॉजीत संशोधन करीत असलेल्या निकोलस यांनी फ्रान्स आणि युरोपात अनेक मैफली गाजविल्या असून या महोत्सवानिमित्ताने भारतात त्यांचा पहिलाच कार्यक्रम होणार आहे.

यानंतर फ्रान्सच्या कला क्षेत्रातील ज्या युवा कलाकारांनी भारतीय संगीतात प्राविण्य प्राप्त केलेले आहे त्यांच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यात नोव्हेंबर महिन्यात पॅरिसच्या इझा बेल ॲना या कथ्थक नृत्य सादर करतील.

ग्रेनोब्ल येथील चित्रकार ॲनमारी बाराट आणि इतर युवा चित्रकारांच्या कलाकृतींचे प्रदर्शन डिसेंबरमध्ये आयोजित केले जाईल. जानेवारीत पॅरिसच्या नृत्यांगना मारीया साल्व्हीनी यांचे भरतनाट्यम तर फेब्रुवारीत मार्सेलचे [illegible] दांपत्य आणि त्यांचे शिष्य भरतनाट्यम आणि फ्रेंच बॅले सादर करतील. एप्रिलमध्ये फ्रेंच फिल्म फेस्टिव्हल भरविण्यात येणार आहे.



निकोलस दलाई

## जि. प. शिक्षकांच्या बदल्यांना स्थगिती

*जळगाव ( म.टा. वृत्तसेवा ) :* जिल्ह्यातील या महिन्यात झालेल्या २३१ प्राथमिक शिक्षकांच्या प्रशासकीय बदल्यांना राज्य शासनाच्या ग्रामीण विकास व जलसंधारण विभागातर्फे स्थगिती देण्यात आली आहे. या आदेशामुळे नियुक्तीच्या ठिकाणी हजर झालेल्या शिक्षकांची पंचाईत झाली असल्याचे बोलले जात आहे.

गेल्या वर्षाप्रमाणे यावर्षीही जिल्ह्यात प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांचे प्रकरण गाजले. बदल्यांच्या घोषणेला एक महिनाही होत नाहीत तोच २३१ शिक्षकांच्या प्रशासकीय बदल्यांना स्थगिती मिळाल्याने हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे.

शिक्षकांच्या जाहीर झालेल्या बदल्यांमध्ये अनेकांची गैरसोय झाल्याबरोबरच मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याच्या तक्रारीही शिक्षक संघटनांनी केल्या होत्या. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने थेट ग्रामीण विकास व जलसंधारण मंत्री अजित पवार यांना याबाबत प्रत्यक्ष भेट घेऊन लक्ष घालण्याची विनंती केली होती. त्यानुसार पवार यांनी दिलेल्या आदेशानुसार राज्याचे उपसचिव बी. एन. पतिंगे यांनी या आशयाचा अध्यादेश काढून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर गायकवाड यांना पुढील आदेश मिळेपर्यंत जिल्ह्यात झालेल्या २३१ प्राथमिक शिक्षकांच्या प्रशासकीय बदल्यांना स्थगिती देण्यात येत असल्याचे कळविले आहे. यामुळे अगोदर बदल्या होऊन नियुक्तिच्या ठिकाणी हजर झालेल्या शिक्षकांची मात्र पंचाईत झाली आहे.

## 'निमा'ची औद्योगिक सूची प्रकाशित

*नाशिक ( म. टा. प्रतिनिधी ) :* मुंबई-पुणे असून औद्योगिक क्षेत्रातले तणाव दूर केले तर

## ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत किकवारी प्रथम

*नाशिक ( म. टा. प्रतिनिधी ) :* संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत २००३-०४ या वर्षासाठी नाशिक विभागातून किकवारीला प्रथम तर वडगाव आमली गावाला द्वितीय पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. किकवारी (ता. सटाणा, जि. नाशिक) गावाला दहा लाख रुपयांचे तर वडगाव आमली (ता. पारनेर, जि. जळगाव) गावाला शासनातर्फे सात लाख रुपयांचे बक्षिस देण्यात येईल. त्याचप्रमाणे वडगाव बुद्रुक (ता. चोपडा, जि. जळगाव) आणि नटवाडे (ता. शिरपूर, जि. धुळे) या गावांनाही प्रत्येकी ३० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात येईल.

## कार्यक्रम

**श्रीराम चिटस व फीशर चेस ॲकॅडमी :** खुली बुद्धीबळ स्पर्धा, समर्थ मंगल कार्यालय, कॅनडा कॉर्नर, स. ९ पासून

**नाएसो सेवानिवृत्त हितगुज मंडळ :** सहविचार सभा, 'नाचू आनंदे' या विषयावर डॉ. विद्युल्लता वैद्य यांचे व्याख्यान, पेठे विद्यालय, दु. ४ वा.

**अभिव्यक्ती, मिडीया फॉर डेव्हलपमेंट :** शुभदीप चक्रवर्ती

Mahesh Tutorials
Estd. 1988
15 Merit Rankers
768 students scoring 85% Agg. & Above in S.S.C. 2004
ADMISSIONS FOR S.S.C. 05-06 START TOMORROW
Pay your fees in 12 Interest Free Instalments of

दि ठाणे जनता सहकारी बँक लि.
शेड्यूल्ड बँक
आपल्या विश्वासाची प्रथम पसंतीची

जाहीर आभार

बँकेचे एक बडतर्फ सभासद व थकित कर्जदार यांनी बँकेची प्रतिमा डागाळण्यासाठी वर्तमानपत्राद्वारे अत्यंत खोटे व खोडसाळ आरोप केले. परंतु बँकेचे भागधारक, खातेदार व हितचिंतक यांनी कोणत्याही प्रकारे विचलित न होता बँकेवर अढळ विश्वास दाखविला परिणामत: गेल्या तीन दिवसात बँकेच्या ठेवी ३ कोटींनी वाढल्या असून ३० जुलै अखेर बँकेच्या ठेवी ९०० कोटीहून अधिक झाल्या आहेत. त्याबद्दल आम्ही अत्यंत आभारी आहोत. बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत मजबूत असून आपला प्रत्येक रूपया अत्यंत सुरक्षित आहे.

बँकेची ३१-०३-२००४ अखेरची आर्थिक स्थिती

(आकडे कोटीत)